पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४

■ वर्ष ७५ वे/अंक २३६ वा ■ ■ अमरावती,मंगळवार,दिनांक १५ एप्रिल २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर १ वैशाख १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

तर मुसलमानांना पंक्चर दुरुस्त करत बसावे लागले नसते

'वक्फ'वरून पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर हल्लाबोल

हिसार दि. १४ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (१४ एप्रिल) काँग्रेसवर तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी वक्फ कायदा बदलण्याचा आरोप केला. ते म्हणाले, वक्फ बोर्डाने त्यांच्या मूळ उद्देशाप्रमाणे कम केलं असतं तर आज भारतातील मुसलमान गरीब राहिले नसते, त्यांना गरिबीत दिवस काढावे लागले नसते, पंक्चर दुरुस्त करण्यासारखी कमी दर्जाची कामं करत बसावं लागलं नसतं. पंतप्रधानांनी काँग्रेसवर संविधान व सामाजिक न्यायाची किंमत मोजून आपली मतपेढी मजबूत करण्यासाठी वक्फच्या नियमांमध्ये बदल केल्याचा आरोप केला.

हरियाणातील हिसार येथे आयोजित एका जनसभेला संबोधित करताना नरेंद्र मोदी म्हणाले, काँग्रेसने सत्ता मिळवण्यासाठी संविधानाचा शस्त्र म्हणून वापर केला. सत्ता कायम ठेवण्यासाठी आणीबाणी लावली. आणीबाणीच्या काळात सत्तेचा दुरुपयोग करण्यासाठी संविधानाच्या मूळ भावनेची हत्या केली.

नरेंद्र मोदींची काँग्रेसवर सडकून टीका

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आपल्या संविधानात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्यांबाबत उहापोह करण्यात आला आहे. परंतु, काँग्रेसने ते कधीही लागू केले नाहीत. काँग्रेसने केवळ मुस्लीम कट्टरपंथीयांचं तुष्टीकरण केलं. आपण (एनडीए) आणलेल्या नवीन कायद्याला त्यांचा विरोध *(उर्वरित पान २ वर)*

'वक्फ'विरोधात पश्चिम बंगालमध्ये पुन्हा हिंसाचार

कोलकाता दि. १४ : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर झालेल्या वक्फ (दुरुस्ती) विधेयकाविरोधात देशभर संतापाची लाट उसळत असताना आता पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्यांदा हिंसाचार घडला आहे. पश्चिम बंगालमध्ये सोमवारी दक्षिण २४ परगणा येथे वक्फ कायद्याच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. यावेळी इंडियन सेक्युलर फ्रंट आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. टाइम्स ऑफ इंडियाने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

बॅरिकेट्स तोडले, वाहने जाळली

कोलकात्याच्या रामलीला मैदानावर आयोजित रॅलीत जाण्यापासून पोलिसांनी आयएसएफ कार्यकर्त्यांना रोखले. त्यामुळे हा हिंसाचार घडून आल्याचं म्हटलं जातंय. खडऋनेते आणि भांगरचे आमदार नौशाद सिद्दीकी या कार्यक्रमात भाषण करणार होते. भांगर, मीनाखान आणि संदेशखली येथील अनेक निदर्शकांना बसंती महामार्गावरील *(पान २ वर)*

टोल संदर्भात पुढच्या १५ दिवसांत मोठा निर्णय : नितीन गडकरी

मुंबई दि. १४ : या देशात पैशाची कमी नाही आहे, इमानदारीने देशाकरता काम करणारांची कमी आहे, मी संकल्प केला आहे की, दरवर्षी १० लाख कोटी रुपयांची कामं करायची, मला काही पैशांची कमी नाही, दोन लाख ८० हजार कोटी रुपये हे माझं बजेट आहे. आता तीन लाख कोटी झालं आहे, असं केंद्रीय परिवहन आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते ७८ व्या वसंत व्याखानमालेमध्ये बोलत होते.

या देशात पैशाची कमी नाही आहे, इमानदारीने देशाकरता काम करणारांची कमी आहे, मी संकल्प केला आहे की, दरवर्षी १० लाख कोटी रुपयांची कामं करायची, मला काही पैशांची कमी नाही, दोन लाख ८० हजार कोटी रुपये हे माझं बजेट आहे. आता तीन लाख कोटी झालं आहे. पण माझा प्रश्न पैशाचा नाही आहे, माझा प्रश्न एवढे पैसे खर्च का होत नाही हा माझा प्रश्न आहे. मुंबई गोवा रस्ता पूर्ण करताना खूप अडचणी आल्या, पण आता येणाऱ्या जूनपर्यंत हा रस्ता १०० टक्के पूर्ण होईल, दिल्ली -जयपूर महामार्ग देखील अडचणीचा होता, असं यावेळी नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. *(उर्वरित पान २ वर)*

'हे बाबासाहेबांचे शत्रू'; पंतप्रधान मोदींच्या टीकेवर काँग्रेसचे प्रत्युत्तर

नवी दिल्ली दि. १४ : काँग्रेस व्होटबँकेचं व्हायरस पसरवत असल्याचा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केल्यानंतर, त्याला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. खरगे यांनी भाजपसहीत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीकास्त्र सोडलं. हे बाबासाहेबांचे शत्रू आहेत, असं खरगे म्हणाले.

डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा अवमान आणि वक्फ दुरुस्ती कायद्याला विरोध करणारा काँग्रेस पक्ष व्होटबँकेचं व्हायरस पसरवत आहे, असा गंभीर आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हरयाणाच्या एका सभेत केला. त्यावर खरगे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

नवी दिल्लीत मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. 'हे लोक डॉ. बाबासाहेबांचे तेव्हाही शत्रू होते आणि आजही आहेत. बाबासाहेब जिवंत असतानाही त्यांनी बाबासाहेबांना कधीच पाठिंबा दिला नाही. जेव्हा बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारला तेव्हा हेच लोक काय म्हणाले ठाऊक आहे का? बाबासाहेब महार समाजाचे आहेत. अस्पृश्य आहेत आणि आता बुद्धांनाही अस्पृश्य केले', *(उर्वरित पान २ वर)*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातूनच संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती : देवेंद्र फडणवीस

मुंबई दि. १४ : मुंबई ही महाराष्ट्राची आहे, असे ठणकावून सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. मुंबई आणि महाराष्ट्र हे एकमेकात रमलेले आहे. भाषावार प्रांतरचनेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातूनच झाली असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि बाबासाहेब यांचे अतूट नाते असल्याचे प्रतिपादित केले.

वडाळा पूर्व येथील कोरबे मिठागर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्यांनी संबोधित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईतील त्यांच्या कार्य कर्तृत्वाला उजाळा देण्यासाठी राज्य शासन इंदू मिल येथे त्यांचे भव्य स्मारक साकारत आहे. त्यांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे.

संविधानाच्या तत्त्वावर देशाचा कारभार सुरू आहे. या संविधानानेच देशाच्या महासत्तेचा मार्ग *(उर्वरित पान २ वर)*

मेहुल चोक्सी याला अटक बेल्जियममधून भारतात आणणार

नवी दिल्ली दि. १४ : पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) घोटाळ्यातील मुख्य आरोपी आणि फरार हिरे व्यापारी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक करण्यात आली आहे. भारतीय सुरक्षा एजन्सींच्या विनंतीवरून चोक्सीला अटक झाली. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने बेल्जियममधील सरकारकडे विनंती केली होती. त्यानंतर ६५ वर्षीय मेहुल चोक्सी याला शनिवारी अटक करण्यात आली होती. तो आता तुरुंगात आहे.

पत्नीसह बेल्जियममध्ये राहत होता

मेहुल चोक्सी याने पंजाब नॅशनल बँकेकडून १३,५०० कोटी रुपयांचा कर्ज घोटाळा केला होता. अटकेपासून वाचण्यासाठी तो भारतातून बेल्जियममध्ये फरार झाला होता. तो तेथे त्याची पत्नी प्रीती चोक्सीसोबत अँटवर्पमध्ये राहत होता. प्रीती चोक्सीकडे बेल्जियमचे नागरिकत्व आहे. चोक्सीकडे बेल्जियममध्ये 'एफ रेसिडेन्सी कार्ड' आहे.

मेहुल चोक्सीला अटक करताना बेल्जियम पोलिसांनी मुंबई न्यायालयाने त्याच्याविरुद्ध जारी केलेल्या दोन अटक वॉरंटचा हवाला दिला. याबाबत इकोनॉमिक टाईम्सने *(उर्वरित पान २ वर)*

भाषणापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्शन माझ्यासाठी मोठे होते : एकनाथ शिंदे

ठाणे दि. १४ : चैत्यभुमीवरील कार्यक्रमातील नियोजित भाषण रद्द करण्याबाबतच्या प्रश्नावर उत्तर देणे टाळत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दादर येथील चैत्यभुमीवरील कार्यक्रमातील भाषणापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्शन माझ्यासाठी मोठे होते, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

चैत्यभुमीवरील कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भाषण होणार होते. मात्र, ऐनवेळेस नियोजित भाषण रद्द करण्यात आले. याबाबत सोमवारी ठाण्यात पत्रकारांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना प्रश्न विचारला. त्यावर दादर येथील चैत्यभुमीवरील कार्यक्रमातील भाषणापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्शन माझ्यासाठी मोठे होते, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभुमीला जाणे, डॉ. बाबासाहेबांचे दर्शन घेणे आणि त्यांना विनम्र अभिवादन करणे, यापेक्षा दुसरे मोठे *(उर्वरित पान २ वर)*

निवडणुका येतात तेव्हा हिंदूंच्या घरांवर हल्ले होतात नवनीत राणा प. बंगालमध्ये जाणार, ममतांना भिडणार

ठाणे दि. १४ : पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे वक्फ बोर्ड विधयेकावरुन हिंसाचार उफळला असून केंद्रीय सुरक्षा दलही येथे तैनात करण्यात आलं आहे. येथील हिंसाचाराच्या घटनेवरुन भाजप नेते मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना लक्ष्य करत आहेत. प्रशासनाकडून कारवाई होत नसल्यानेच येथील हिंसाचाराला बळ मिळाल्याचा आरोप ममता बॅनर्जी यांना त्यांची जागा प.बंगालमधील भाजप नेत्यांनी केला आहे. आता, भाजपच्या महिला नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी देखील ममता बॅनर्जी सरकारला लक्ष्य केलं आहे. तसेच, आपण पश्चिम बंगालमध्ये जाऊन दाखवून देऊ, असेही राणा यांनी म्हटलं आहे.

नवनीत राणा भिवंडीतील बागेश्वर धाम मंदिरात आल्या असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, देशात हिंदुराष्ट्र बनवण्याचा संकल्प गुरुजींचा आहे, त्याला मदत करण्याची भूमिका आमची आहे. धीरेंद्र शास्त्री महाराज जे काम करीत आहेत हिंदू राष्ट्र म्हणून त्यांनी जो प्रण केला आहे, त्यासोबत आमच्या सारखे भक्त जोडले गेलो आहोत. त्यांच्या सोबत लाखो भक्त, युवक, राजकीय लोक जोडली गेली आहेत. गुरुजींच्या या लढ्यात आम्ही त्यांच्यासोबत असल्याचे सांगण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी या ठिकाणी आले आहे, असे *(उर्वरित पान २ वर)*

उद्धव ठाकरेंना राजकीयदृष्ट्या संपविण्यासाठी...; राऊतांचे नाव घेत चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा दावा

मुंबई दि. १४ : महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र प्रतिगामी शक्तींच्या विळख्यात सापडला. 'फुले' चित्रपटास त्यातूनच विरोध सुरू आहे. महाराष्ट्रात 'फुले-आंबेडकर विरुद्ध फडणवीस' असा हा झगडा आहे! मुख्यमंत्री फडणवीस या सामाजिक विषयावर गप्प का बसले आहेत? त्यांनी मौन सोडावे. नाहीतर हा झगडा 'फुले विरुद्ध फडणवीस' असाच आहे यावर शिक्का बसेल अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय संजय राऊत यांनी सामनाच्या अग्रलेखातून केली आहे. आता यावर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा दावा केलाय.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, कधी काळी उद्धव ठाकरे या राज्याचे मुख्यमंत्री होते, या गोष्टीवर विश्वास बसू नये, असाच त्यांचा सध्याचा वावर आहे. 'सामना' तील अलीकडच्या काही दिवसांतील अग्रलेख हे उद्धव ठाकरे यांना राजकीयदृष्ट्या संपविण्यासाठी संजय राऊतांकडून लिहिले जात आहेत, अशी शंका खुद्द उद्धव *(उर्वरित पान २ वर)*

मोदीजी, आरएसएसचा सरसंघचालक दलित, मुस्लिम किंवा महिला कधी करणार?: हर्षवर्धन सपकाळ

मुंबई दि. १४ : संविधानाचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यातील सलोख्याचे संबंध जगजाहीर आहेत. नेहरुंनी बाबासाहेबांना सन्मानाने देशाच्या पहिल्या कायदा मंत्रीपदाची जबाबदारी दिली. आज काँग्रेस पक्षाचा अध्यक्षही दलित समाजाचा आहे पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सरसंघचालक दलित, मुस्लीम किंवा महिला कधी करणार? असा थेट सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केला आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी काँग्रेस पक्षाबद्दल केलेले वक्तव्य अत्यंत हास्यास्पद आहे, या विधानाचा *(पान २ वर)*

माहोल....

महापुरुषांच्या जयंत्या फक्त मोठ्या धूमधडाक्यात साजऱ्या करायच्या असतात, त्यांचे विचार वगैरे आचरणात थोडीच आणायचे असतात...